नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २९/०७/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

## मौजा परसोडी शिवारात जुगार अडयावर धाड
## पोलिस स्टेशन मौदा ची कार्यवाही

दिनांक २८/०७/२०२२ रोजी पोलिस स्टेशन मौदा चे पथक हे पो.स्टे. मौदा परिसरात पेट्रलिंग करीत असतांना त्यांना खात्रीशीर गुप्त माहितगारामार्फत माहिती मिळाली की, काही इसम हे मौजा परसोडी महालगाव मौदा येथे जुगार खेळत आहे. त्यावरून पोलिस स्टेशन मौदा चे पोलिस पथकाने दिनांक २८/०७/२०२२ चे १८:४० वा. ते १९:४० वा. मौजा परसोडी शिवारातील पराते यांचे शेताचे बाजुला असलेल्या खुले जागेत छापा घातला असता आरोपी नामे क्र. १) खुशाल हरिचंद्र पौनिकर वय ३५ वर्ष, रा. जुनी मंगळवारी नागपुर, २) कुणाल अरूण ढेपे वय ४० वर्ष, रा. शिवनगर नंदनवन नागपुर, ३) प्रशांत लक्ष्मण चौधरी, वय ३५ वर्ष, रा. नंदणवन नागपूर, ४) अतुल राजु निमजे वय १९ वर्ष, रा. पाचपावली नागपुर, ५) संजय मुरलीधर झाडे वय ३८ वर्ष, रा. नंदनवन नागपुर, ६) प्रवीण गणेश निमवल वय २७ वर्ष, रा. तांडा पेठ नागपुर, ७) हेमंत विरसिंग ठाकुर वय २० वर्ष, रा. गोळीबार चौक नागपुर ८) अंकुश सुरेश खडगी वय ३८ वर्ष, रा. पाचपावली नागपुर ९) निलेश निलकंठ नाईक वय ३० वर्ष, रा. पडोले चौक नागपुर, वय ३० वर्ष, रा. पडोळे नगर नागपूर, १०) मनिष मोहन गन्यापवार वय ३२ वर्ष, रा. नंदनवन नागपुर, ११) योगेश ईश्वरचंद आश्टणकर, वय ३६ वर्ष, रा. जुनी मंगळवारी नागपुर, १२) वसीम रफीक शेख वय ३५ वर्ष रा. केडीक कॉलेज, चौक नागपुर, १३) निकेश राजु श्रीपाते वय २९ वर्ष, रा. गंगाबाई घाट नागपुर, १४) देवेन्द्र जय मुंडले, वय ३२ वर्ष, रा. नंदनवन नागपुर, १५) गिरीश अशोक उमरेडकर वय २९ वर्ष, रा. जुनी मंगळवारी नागपुर हे ५२ तासपत्त्यांवर हारजीतचा जुगार खेळ खेळतांना मिळून आले. आरोपीतांना ताब्यात घेवून त्यांच्या कडून ५२ ताशपत्ते, नगदी १७,०००/—रु. रोख रक्कम, ५ वाहने किमती ३,३०,०००/—रू. व असा एकुण कि. ३,४७,५००/— रू. चा मुद्देमाल मिळून आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपई रवि वानखेडे पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम १२ मुंबई जुगार कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील पोलिस नाईक देवेन्द्र भुरे मो.नं. ७७२२००३३४२ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. हेमंतकुमार खराबे, सहायक पोलीस निरीक्षक श्री. सोनेकर, पोलिस नाईक देवेन्द्र भुरे, संजय बरोदिया, श्रीराम डोईफोडे, संदीप बाजनघाटे पोलीस शिपाई रवि वानखेडे, विनोद बडगे यांनी पार पाडली आहे.

## नरखेड येथील जुगार अड्डयावर धाड
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक २८/०७/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक काटोल उपविभागात गस्त करीत असतांना पोलीस स्टेशन नरखेड हद्दीतील नारायण सभागृह नरखेड येथे काही इसम हे तासपत्त्यांवर पैशांची बाजी लावुन काही इसम अवैधरित्या जुगाराचा पैशाचा हारजीतचा खेळ खेळत असल्याचे गोपनिय माहीती पथकास प्राप्त झाली. त्यावरून दिनांक २८/०७/२०२२ चे १७.१० वा. ते १८.०० वा. सुमारास सदर पथकाने नारायण सभागृह नरखेड येथे सापळा रचुन छापा टाकुन एकुण ५ जुगारी इसम नामे १.संदिप उर्फ गडबळ किशोर कठरने, वय ३६ वर्ष, रा. वार्ड.न.१२ नरखेड, २. श्रीपाल केशव पाटील, वय ३२ वर्ष, रा.वार्ड.न.१३ नरखेड, ३. नामदेव संतोष सोनेकर, वय ३६ वर्ष, रा. पिंपळगाव नरखेड, ४. जगन्नाथ देवीदास माठोलिया, वय ५२ वर्ष, रा. रा.वार्ड.न.०७ नरखेड व ५. सोनु मोहम्मद शफी शहा, वय २६ वर्ष, रा. ईस्लामपुर नरखेड यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन ५२ ताशपत्ते, नगदी ८,८००/—रू, जुगाराचे इतर साहीत्य व दोन दुचाकी असा एकुण १,५९,८३०/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीं विरूध्द पोलीस ठाणे नरखेड येथे अप.क्र. ३००/२०२२ कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपींना जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे नरखेड यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस ठाणे नरखेड येथील पोलिस नाईक कैलास उईके मो.क्र. ९७३०७२१९८० हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहा. फौजदार सुनिल मिश्रा, पोलीस हवालदार दुर्गाप्रसाद पारडे, निलेश बर्वे, दिनेश आधापूरे, पोशि आशुतोष लांजेवार यांचे पथकाने केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर